
# स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती

## (एफपीआयसी) मार्गदर्शिका



actionaid

सर्व हक्क राखीव. हे माहितीपत्र, संपूर्ण किंवा त्याचा काही भाग समीक्षा, पुनःनिर्मिती, अनुवाद अथवा उद्धृत करण्यासाठी त्याच्या मूळ आवृत्तीचा संदर्भ देऊन वापरले जाऊ शकते. या माहितीपत्रातील विश्लेषणात्मक आणि धोरणात्मक सूचना ह्या ऍक्शन ऐड, इंडियाच्या भूमिकेशी सहमत असतीलच असे नाही.

Copyright © Action Aid 2017
Report published in 2018

प्रकाशक
नॅच्युरल रिसोर्स नॉलेज ऍक्टिव्हिस्ट हब
ए नॉलेज इनिशिएटिव्ह ऑफ ऍक्शन ऐड इंडिया
३३१/ए शहिद नगर, भुवनेश्वर- ७५१००७
दूरध्वनी- ०६७४२५४८२२४/२५४८५०३

मुद्रांकन : बाबा प्रिण्टर्स, भुबनेश्वर

डिझाईन : नॅच्युरल रिसोर्स नॉलेज ऍक्टिव्हिस्ट हब

रेखांकने : रजत कुमार धल

# स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती
## (एफपीआयसी) मार्गदर्शिका



actionaid

## ऋणनिर्देश

जागतिकीकरणाचे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वाढत्या मागणीचे, परिणामी नैसर्गिक संसाधनांच्या प्रचंड प्रमाणातील वापराचे गंभीर पडसाद जगभरातील आदिवासींच्या किंवा तेथील स्थानिक रहिवाशांच्या पारंपारिक जीवनमानावर उमटत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साधनांवर येणाऱ्या ताणामुळे त्यांच्या राहणीमानाचे व तेथील जैविक विविधतेचे नुकसान होत आहे. त्याचबरोबर, त्यांना सक्तीने विस्थापन किंवा स्थलांतर करावे लागत आहे. दुर्दैवाने, अशा तणावपूर्ण परिस्थितीत हिंसा, संघर्ष आणि तणावाचे गंभीर वातावरण तयार होत आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.६ टक्के म्हणजेच जवळपास १०.४ कोटी इतकी लोकसंख्या आदिवासींची आहे. त्यांना खाण उद्योग व वाढते औद्योगिकीकरण अशा कारणांमुळे विविध प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागत आहे. यात राहत्या जमिनीवरून हाकलून दिले जाणे यांसारख्या गंभीर बाबींचा देखील समावेश आहे. सर्वच ठिकाणी आदिवासी म्हणजेच तेथील स्थानिक रहिवासी त्यांच्या जमिनी, जंगल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण करण्यासाठी धडपड करत आहेत. आदिवासी लोकांच्या हक्कांचे सरंक्षण करण्यासाठी ग्रामपंचायत( अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित) अधिनियम कायदा, १९९६ आणि अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन रहिवासी (वन हक्क कायद्यांतर्गत), २००६ यांसारखे बरेच पुरोगामी कायदे बनविण्यात आले आहेत. परंतु, या कायद्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने केली जात नाही.

या संदर्भात, आदिवासी किंवा स्थानिक रहिवाशांच्या हक्कांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर बनविण्यात आलेल्या नियमांची किंवा मांडलेल्या भूमिकांची मोठ्या प्रमाणावर मदत होऊ शकते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना करार (क्र. १६९) आणि संयुक्त राष्ट्राचे स्थानिक लोकांच्या हक्कांविषयीचे घोषणापत्र (यूएनडीआरआयपी), २००७ या दोन महत्वाच्या कागदपत्रांनुसार स्थानिक रहिवाशांच्या जीवनमानावर व नैसर्गिक साधनांवर परिणाम करू शकणारे कोणत्याही प्रकारचे प्रकल्प किंवा उपक्रम राबविण्याआधी स्थानिक रहिवासी किंवा आदिवासी समुदायांकडून स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती (एफपीआयसी) घेणे गरजेचे आहे. एफपीआयसी ही एक मूलभूत प्रक्रिया म्हणून आकाराला येत असल्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या पिढीजात असलेल्या प्रदेशांना संरक्षण मिळत आहे. तसेच, स्थानिक रहिवाशांच्या जमिनींवर भविष्यात नियोजित असलेली विकासकामे करण्याआधी त्यांची सहमती घेतली जात आहे.

आपापल्या कामात एफपीआयसी कशा पद्धतीने समाविष्ट करता येईल यासंबंधात संयुक्त राष्ट्राची अन्न व कृषी संस्था, ऍक्शन ऐड आणि इतर सहकारी संस्था एकत्र आल्या. या सहयोगातून सर्वप्रथम एक पुस्तिका तयार करण्यात आली ज्यात कोणताही प्रकल्प राबविण्याआधी प्रकल्पाशी संबंधित लोकांसाठी एफपीआयसीची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येऊ शकते हे तपशीलवार मांडण्यात आले आहे. यामुळे, कोणत्याही प्रकल्पाचे नियोजन करताना, तो राबविताना आणि त्याचे मूल्यांकन करताना स्थानिक रहिवाशांचे हक्क निश्चितपणे लक्षात घेतले जातील व त्यांचा मान ठेवला जाईल.

एफपीआयसीच्या या मूळ पुस्तिकेची संक्षिप्त स्वरूपातील आवृत्ती ऍक्शन ऐड, इंडियाने भारतीय संदर्भ आणि कायदे लक्षात घेऊन तयार केली आहे. आदिवासी आणि स्थानिक रहिवाशांच्या फायद्यासाठी या आवृत्तीचा विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद करण्यात आला आहे. यामुळे या विषयाशी निगडित काम करणाऱ्या सर्वांनाच एकाच ठिकाणी योग्य माहिती मिळण्यास मदत होऊन, अधिकाधिक लोकांपर्यंत ती माहिती पोहचवता येईल. या संधीचा फायदा घेत, या प्रक्रियेत ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आम्ही आभार मानू इच्छितो.

एफपीआयसीच्या संक्षिप्त आवृत्तीचे स्वरूप ठरवण्यात, तिचे संपादन करण्यात आणि वैचारिक सहकार्यात मदत केल्याबद्दल संयुक्त राष्ट्राच्या अन्न व कृषी संस्थेच्या आदिवासी लोकांच्या संदर्भात काम करणाऱ्या टीमचे आम्ही मनापासून आभार मानतो. आमचे सहकारी, नरेंद्र शर्मा (हिंदी अनुवाद), विनायक पवार ( मराठी अनुवाद) , नंदिनी ( कन्नडा अनुवाद), रेणुका कास्था(गुजराती अनुवाद), प्रियाव्रत, बिरेन नायक आणि रतिकांत (ओडिया अनुवाद), डॉ. बेलाराम घोगरा(बागडी अनुवाद), जलंधर (कुई अनुवाद), सरद कुमारी (संथाली आणि मुंडारी अनुवाद ) या सर्वांचे विविध भाषांत अनुवाद केल्याबद्दल मनापासून धन्यवाद.

आम्हाला सातत्याने सहकार्य व प्रोत्साहन दिल्याबद्दल ऍक्शन एड, इंडियाचे कार्यकारी संचालक संदीप छाचरा यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत.

**ब्रतिंदी जेना,**
**संचालक, नॅच्युरल रिसोर्सस हब, ऍक्शन एड, इंडिया**

# स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती
## (एफपीआयसी) महत्वाचे मुद्दे

### पार्श्वभूमी

मागील काही वर्षांत, आम्हाला आढळून आले की अनियंत्रित पद्धतीने नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट केली जात आहे आणि त्यामुळे वाढत चाललेल्या स्थानिक लोकांच्या आक्रोशातून ही बाब समोर आली आहे की आयएलओ १६९ व संयुक्त राष्ट्राच्या स्थानिक लोकांच्या हक्काबाबतीत असलेल्या घोषणापत्राचे (यूएनडीआरआयपी) पालन योग्य पद्धतीने केले जात नाही. खासकरून, ज्या प्रकल्पांमुळे स्थानिक लोकांच्या साधनसंपत्तीवर परिणाम होतो असे प्रकल्प राबविण्याआधी दिल्या जाणाऱ्या स्वतंत्र, पूर्वसूचित आणि माहितीवर आधारलेल्या समंती बाबतीत याचे योग्य पालन झाल्याचे आढळून येत नाही. स्थानिक आणि भूमिपुत्रांच्या वारसाहक्काने मिळालेल्या क्षेत्रांच्या बचावासाठी आणि वारंवार साधनसंपत्तीची लूट करणाऱ्या उद्योगांतून नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या त्यांच्या जमिनींवर किंवा भागांवर होणाऱ्या अतिक्रमणांना वाचा फोडण्यासाठी पुढील माहिती देत आहोत.





सार्वजनिक चर्चेतून अधिकारांच्या वापराची प्रक्रिया

### स्वतंत्र, पूर्वसूचित आणि माहितीवर आधारित समंती म्हणजे काय?

स्वतंत्र, पूर्वसूचित आणि माहितीवर आधारित समंती (एफपीआयसी) हा जगभरातील स्थानिक किंवा भूमिपुत्रांशी निगडित असलेला एक विशिष्ट अधिकार आहे. स्थानिक लोकांचे स्वतःसाठी निर्णय घेण्यासंबंधी तसेच नैसर्गिक साधनसंपत्ती आणि त्यांचे क्षेत्र यासंबंधी असलेल्या विविध हक्कांचा एकत्रित विचार करून एफपीआयसी ही प्रक्रिया जागतिक मानवी अधिकारांचे एक प्रमाण म्हणून उदयास आले आहे.

ज्या प्रकल्पांमुळे स्थानिक लोकांच्या जीवनमानावर परिणाम होऊ शकतो अशा प्रकल्पांना एफपीआयसीच्या आधारे स्थानिक लोक संमती देऊ अथवा नाकारू शकतात. समंती दिल्यास, ती ते कोणत्याही वेळेस नाकारू शकतात. ज्यामुळे स्थानिक लोक प्रकल्पाची बांधणी, अंमलबजावणी, देखरेख आणि मूल्यमापन यासंबंधातील शर्ती / अटींबाबत वाटाघाटी करू शकतात. त्याचबरोबर स्थानिक लोक कोणत्याही प्रकारच्या चर्चांमध्ये



समुदायांसोबत माहिती सामायिक करणे

सहभागी न होण्याचा पर्याय निवडू शकतात. अशा निर्णयाचे स्वागत केले जायला हवे आणि त्यापुढे कोणताही संपर्क केला जाऊ नये.

## एफपीआयसी ही प्रक्रिया का आहे?

स्थानिक लोकांच्या समुदायाने एकत्रितपणे समंती देण्याआधी किंवा नाकारण्याआधी निर्णयप्रक्रियेचे अनेक टप्पे पार करणे गरजेचे असते, त्यामुळे एफपीआयसी ही एक प्रक्रिया म्हणून गणली जाते. त्याचबरोबर, एफपीआयसीची अंमलबजावणी ही प्रकल्पाचा संपूर्ण कालावधी, म्हणजेच सुरुवातीच्या प्रकल्प समजावून घेण्याच्या प्राथमिक टप्प्यांपासून ते प्रकल्प संपेपर्यंत चालू असते.

## एफपीआयसीतील महत्वाचे घटक

या संदर्भात स्वतंत्र म्हणजे स्वतःहून कोणत्याही जबरदस्ती, दमदाटी किंवा फसवणुकी शिवाय दिलेली संमती. त्याचप्रमाणे निर्णयाची अपेक्षा आणि वेळापत्रक हे जरी बाहेरून लादलेले असेल तरी देखील निर्णय घेण्याची प्रक्रिया ही स्थानिक लोकांच्या समुदायाने स्वतः ठरवलेली असणे असाही त्याचा अर्थ आहे.

## पुर्वसुचीत

पूर्वसूचित म्हणजे, कोणत्याही उपक्रमाची अधिकृतता ठरविण्यापूर्वी किंवा सुरुवात करण्यापूर्वी पुरेशा वेळेआधी संमती घेणे. त्याचप्रमाणे समंती ही स्थानिकांच्या समुदायाकडून परवानगी घेण्याची गरज उद्धवेल अशा ऐनवेळेस न घेता, गुंतवणुकीचे किंवा विकास कामांचे नियोजन करण्याच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यांमध्ये घेण्यात यावी.

माहितीया संदर्भात माहितीवर आधारित म्हणजे, प्रामुख्याने प्रकल्पाचे स्वरूप आणि त्यासाठी समंती मिळविण्याआधी किंवा संमती मिळविण्याची प्रक्रिया सुरु असताना कोणत्या प्रकारची माहिती दिली



परियोजना के लिए समुदाय से सहमती लेते हुए



जमाती/ मूलनिवासी लोक हे वनांचे मालक आहेत

जाणे गरजेचे आहे.


संमतीचा अर्थ, सर्व हक्कधारकांनी एकत्रितपणे आणि ज्या स्थानिक लोकांवर किंवा समुदायांवर परिणाम होणार आहे अशा सर्वांच्या निर्णयप्रक्रियेच्या ठराविक पद्धतीनुसार निर्णय घेणे. समंती देणे किंवा नाकारणे ही प्रक्रिया प्रत्येक समुदायाच्या ठराविक अशा, औपचारिक किंवा अनौपचारिक, राजकीय व प्रशासकीय पद्धतीने घडायला हवी. स्थानिक लोक व समुदाय हे त्यांच्यातून स्वतंत्रपणे निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत निर्णयप्रक्रियेत सहभागी होऊ शकायला हवेत आणि त्यामध्ये तरुण, महिला, वृद्ध आणि विकलांग लोकांचा देखील मोठा सहभाग असायला हवा.

## एफपीआयसी प्रक्रियेचे फायदे?


कोणतेही विकासकाम प्रत्यक्षात केले जाताना स्थानिक लोकांच्या आणि भूमिपुत्रांच्या गरजा व प्राधान्य लक्षात घेतल्या जातात. कारण, या संदर्भात स्थानिक लोक व भूमिपुत्रांना मिळणारे फायदे हे प्रकल्पाशी संबंधित इतर सर्व भागधारकांपेक्षा महत्वाचे मानले जातात. त्याचबरोबर, आदरपूर्वक व खोलात जाऊन केल्या गेलेल्या एफपीआयसी प्रक्रियेतुन एखाद्या संभाव्य प्रकल्पाच्या नियोजनामध्ये स्थानिक लोकांचा संपूर्ण व परिणामकारक सहभाग होऊ शकतो.

## मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून एफपीआयसी

एफपीआयसीच्या मुळामध्ये मानवी हक्कांचा दृष्टिकोन हा खोलवर रुजलेला आहे. यामध्ये, अर्थपूर्ण आणि सकारात्मक उपाय शोधताना स्थानिक लोकांच्या गरजा आणि आकांक्षा लक्षात घेतल्या जातात. त्यासाठी निर्णयप्रक्रियेत स्थानिक लोकांचा परिणामकारक सहभाग असण्यावर भर दिला जातो व निर्णय घेताना स्थानिक लोकांच्या



नैसर्गिक संसाधनांची माहिती एकत्रित करून आपल्या सामुदायिक अधिकारांचा वापर करताना



आपण एक सामूहिक निर्णय घेण्याची प्रक्रियेच्या रूपात एफपीआयसी द्वारे हे चित्र बदलवू शकतो

संस्कृतीतून पुढे आलेले मुद्दे लक्षात घेतले जातात.


## एफपीआयसीची वैशिष्ट्ये कोणती आहेत?

### अ. स्वतःच्या जमिनी, प्रदेश आणि साधनांवर स्थानिक लोकांचे नियंत्रण असणे, त्याचबरोबर त्यांच्या सांस्कृतिक एकात्मतेचा सन्मान अबाधित ठेवणे.

एफपीआयसी मुळे स्थानिक लोकांकडे असलेले त्यांच्या संसाधनांच्या, जमिनीच्या आणि प्रदेशाच्या नियोजनाचे व नियंत्रणाचे अधिकार अबाधित राहतात. त्याचप्रमाणे त्यांच्या सांस्कृतिक एकात्मतेचा व स्वतःसाठी निर्णय घेण्याच्या क्षमतेचा मान ठेवून त्यांच्या विकासाची सूत्रे त्यांच्याच हातात राहतात. कोणत्याही बाह्य संस्थेला, जसे की प्रशासन, उद्योगधंदे, संस्था, संघटना आणि एखाद्या प्रकल्पाचे समर्थक ह्यांना स्थानिक लोकांची समंती, मान्यता आणि अधिकृतता कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी करण्यापूर्वी घ्यावी लागते. खासकरून, अशा वेळेस जेव्हा प्रकल्पाचा परिणाम स्थानिक लोकांच्या जीवनमानावर होण्याची शक्यता असते.

### ब. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचा अधिकार

जमिनी, प्रदेश व संसाधनांच्या मालकीबाबत स्थानिक लोकांचे स्वतःच्या अशा काही पारंपरिक शासन पद्धती असतात. त्यात त्यांच्या सामाजिक-राजकीय पद्धती, पारंपरिक कायदे व पद्धती, संसाधनांचे नियोजन आणि पारंपरिक ज्ञान व सांस्कृतिक पद्धती गणल्या जातात. यामुळे त्यांची प्रवाहातील प्रबळ समाजापेक्षा वेगळी ओळख असते. एफपीआयसीतून त्यांना भेडसावणाऱ्या मुद्द्यांविषयीचे निर्णय स्वतः घेण्याची यंत्रणा उभी राहते. यामुळे स्थानिक लोकांवर त्यांच्या जमिनी, प्रदेश आणि संसाधनाच्या संदर्भात स्वतःसाठी स्वतः निर्णय घेण्याच्या क्षमतेवर व विकासावर निर्बंध येतील, अशा प्रकारचे निर्णय लादले गेले तर त्यावर प्रतिबंधात्मक आखणी करता येते.



न्यायपालिका व इतर संस्थांबरोबर संपर्क प्रक्रियेद्वारे एफपीआयसी समूहांना एक ताकद देईल

## क. सुरक्षेचा उपाय म्हणून एफपीआयसी

स्थानिक लोकांवर कोणत्याही उपक्रमाचे अथवा प्रकल्पाचे सामाजिक व पर्यावरण विषयक होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन सुरक्षा उपायांच्या दृष्टीने एफपीआयसीचा विचार केला जातो. या प्रक्रियेमुळे स्थानिक लोक प्रकल्पाचे संभाव्य गंभीर परिणाम डोळ्यासमोर ठेवून त्याविरुद्ध आवाज उठवू शकतात. या प्रक्रियेत, स्थानिक लोक प्रकल्पचा प्रस्ताव ठेवणाऱ्या घटकांकडे प्रकल्पाविषयीची सर्व माहिती स्पष्टपणे उघड करण्याची मागणी करू शकतात. यामध्ये प्रकल्पाच्या व्यवहार्यता व तुलनात्मक अभ्यासाचा समावेश असणे गरजेचे असते.

## ड. एफपीआयसी - एकत्रितपणे निर्णय घेण्याची प्रक्रिया

एफपीआयसी ही केवळ एक करायची म्हणून केलेली प्रक्रिया नसून ती एक मूलभूत यंत्रणा आहे. ज्यातून स्थानिक लोकांच्या स्वतः निर्णय घेण्याच्या हक्काला अबाधित ठेवले जाते. खासकरून, एफपीआयसीचा उपयोग जमिनी, प्रदेश आणि संसाधनाच्या वापर, नियोजन आणि विकासासंदर्भात केला जातो. एकत्रितपणे घेतल्या जाणाऱ्या निर्णयप्रक्रियेचा भाग असणाऱ्या प्रत्येक स्थानिक समुदायासाठी असलेले ते एक एकत्रितपणे मान्य केलेले हमीपत्र आहे. स्थानिक लोकांचे अस्तित्व हे समूहांमध्ये असते आणि त्यामुळे सामूहिकपणे जगण्यासाठी व विकासासाठी ते एकमेकांवर अवलंबून असतात.

## इ. एफपीआयसी- वारंवार केली जाणारी प्रक्रिया

## फ. एफपीआयसी- प्रशासन व इतर बाह्य घटकांच्या संदर्भात सहकार्याची प्रक्रिया

स्थानिक लोकांचे हक्क अबाधित ठेवण्याबरोबरच, एफपीआयसीची प्रक्रियेतून स्थानिक लोकांचे प्रकल्प, योजना, उपक्रम, कायदे आणि धोरणे यांबाबतीत प्रशासनासारख्या बाह्य घटकांबरोबर असलेले हितसंबंधांची अर्थपूर्ण आखणी केली जाते. या संदर्भात, कोणतीही योजना किंवा उपक्रम ज्याचा स्थानिक लोकांच्या जीवनमानावर परिणाम होणार आहे, अशा उपक्रमांमध्ये परस्परांवर विश्वास (संपूर्ण, अचूक आणि आकलन होईल अशा पद्धतीने माहिती देण्यात यावी) ठेवण्याची गरज असते. त्याचबरोबर सल्लामसलत आणि संवादांतून स्थानिक लोकांची समंती मिळविण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

## स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती (एफपीआयसी) संक्षिप्त स्वरूपात

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कायदा व्यवस्थेत एफपीआयसीचे तत्व

स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती, किंवा एफपीआयसी, हे आंतरराष्ट्रीय कायद्यातील प्रामुख्याने उदयास येणारे एक महत्वाचे तत्व आहे. ज्यामुळे स्थानिक लोकांना, त्यांच्या जमिनी व पारंपरिक जीवनशैलीवर परिणाम होईल अशा उपक्रमांसंदर्भात, स्वतःसाठी स्वतंत्रपणे आणि माहितीपूर्वक निर्णय घेण्याचा हक्क प्राप्त होतो.

### आंतरराष्ट्रीय कामगार संघटना करार (क्र. १०७), स्थानिक व आदिवासी लोकसंख्येविषयी, १९५७

स्थानिक लोकांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक हक्कांच्या रक्षणासाठी हा करार करण्यात आला आहे. या करारात नमूद केले आहे की, अशा समुदायांना त्यांच्या राहत्या व सवयीच्या क्षेत्रातून त्यांनी स्वतंत्रपणे परवानगी दिल्याशिवाय हलविण्यात येऊ नये.

### आंतरराष्ट्रीय कामगार संघटना करार (क्र. १६९), स्थानिक व आदिवासी लोकसंख्येविषयी, १९८९

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या क्र. १६९ या करारानुसार, स्थानिक लोकांना त्यांच्या जमिनींवरुन किंवा क्षेत्रांतून स्वैरपणे हलविले जाऊ शकत नाही. अपवाद म्हणून त्यांच्या स्थलांतराचा विचार केला जाऊ शकतो. परंतु, त्यासाठी देखील त्यांची स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती असणे गरजेचे आहे. ज्या वेळेस त्यांची समंती मिळू शकत नाही, अशा वेळेस त्यांचे स्थलांतर हे राष्ट्रीय कायदा व्यवस्था व नियमांप्रमाणे कराव्या लागणाऱ्या सर्व प्रक्रियांच्या आधारे केले जाऊ शकते. ज्यामध्ये सार्वजनिक चौकशीची व्यवथितपणे अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. यामुळे प्रक्रियांमध्ये सहभागी असलेल्या लोकांचे परिणामकारक प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होते.

### संयुक्त राष्ट्राचे स्थानिक लोकांच्या हक्कांविषयीचे घोषणापत्र (यूएनडीआरआयपी), २००७

यूएनडीआरआयपी हे स्थानिक लोकांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीविषयीचे एक प्रमाण आहे. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी व त्यांच्याबरोबर केल्या जाणाऱ्या भेदभावाचा विरोध करण्यासाठी ते एक महत्वाचे साधन आहे. या घोषणेपात्रामुळे हे सुनिश्चित करण्यात आले की, स्थानिक लोकांना त्यांच्या जमिनी व क्षेत्रांतून बळजबरीने हलविले जाऊ शकत नाही. कोणत्याही प्रकारचे स्थलांतर स्थानिक लोकांच्या स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेल्या समंतीशिवाय केले जाऊ शकत नाही. स्थलांतरास समंती मिळाल्यावर देखील, त्यांना योग्य मोबदला दिला जावा, तसेच शक्य असल्यास त्यांच्या जमिनी त्यांना परत दिल्या जाव्यात.

या घोषणापत्राने पुन्हा एकदा हे सुनिश्चित केले की, प्रशासनाने स्थानिक लोकांवर परिणाम होईल असे कोणतेही कायदेशीर अथवा प्रशासकीय मार्ग अवलंबण्याआधी आपले प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांमार्फत स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन व त्यांना सहकार्य करून त्यांच्याकडून स्वतंत्र, पूर्वसूचित व माहितीच्या आधारे दिलेली समंती घ्यावी.

## जैविक विविधता करार(सीबीडी), १९९२

जैविक विविधता कराराने स्थानिक लोकांचे त्यांच्या पारंपरिक जीवनशैलीनुसार त्यांचे नैसर्गिक साधनसंपत्तीवर असलेले अवलंबीत्व मान्य केले आहे. त्याचबरोबर, स्थानिक लोक त्यांच्याकडे असलेले पारंपरिक ज्ञान, त्यांनी लावलेले नवीन शोध व पारंपरिक पद्धतींमुळे नैसर्गिक संसाधनांचा ते संयत वापर करतात आणि त्यामुळे जैविक विविधता टिकून राहण्यास मोठी मदत मिळते आहे, असेही या कराराने मान्य केले आहे. या कराराने जैविक विविधता टिकवण्यात व त्याचा संयत वापर करण्यात महिलांचा महत्वाचा वाटा आहे असेही ओळखले आहे. त्यामुळे, जैविक विविधतेचे संवर्धन करण्याविषयीचे धोरण आखताना व त्याची अंमलबजावणी करताना, अशा सर्वच पातळयांवर महिलांचा मोठा सहभाग असायला हवा, या विचाराचा जैविक विविधता करार पुरस्कर्ता आहे.

## भारतीय संविधानात एफपीआयसी

पाचव्या व सहाव्या अनुसूचीतील तरतुदीनुसार अनुसूचित क्षेत्रांचे व अनुसूचित जमातींचे प्रशासन हे देशातील आदिवासी क्षेत्राला लागू पडते. आदिवासी लोकांची स्वायत्तता टिकावी, त्यांची संस्कृती जपली जावी व त्यांचा आर्थिकदृष्ट्या विकास व्हावा, जेणेकरून त्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर न्याय मिळेल. त्यामुळे आदिवासी क्षेत्रांमध्ये शांतता व योग्य प्रशासन कार्यरत राहील. असा आदिवासी क्षेत्रे व तेथील नियम यामागील उद्देश आहे.

## ग्रामपंचायत (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित) अधिनियम कायदा (पेसा ऍक्ट), १९९६

ग्रामपंचायत(अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित) अधिनियम कायदा, १९९६ समुदायाचे नेहमीचे कायदे, सामाजिक व धार्मिक पद्धती आणि पारंपरिक पद्धतीनुसार समुदायाच्या साधनांचे नियोजन अशा बाबींचे अस्तित्व सुनिश्चित करतो. आदिवासी क्षेत्राततील खाणीसाठी परवाना घेण्यापूर्वी किंवा किरकोळ खनिजांसाठी खाणकाम करण्यासाठी भाडेतत्वावर जागा घेण्यापूर्वी, ग्रामसभेने किंवा ग्रामपंचायतीने दिलेल्या सूचना योग्य पातळीवर अनिवार्य केल्या जाव्यात.

## वन हक्क कायदा, २००६

पूर्वी पारित केलेल्या धोरणांमुळे व कायद्यांमुळे आदिवासी समुदायांना त्यांच्या स्वतःच्या जीवनशैलीविषयी आलेला परकेपणा कमी करण्याचा ह्या कायद्याचा उद्देश आहे. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, जोपर्यंत हक्क ठरविण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही तोपर्यंत कोणत्याही आदिवासी व्यक्तीस

तिने सध्या अधिग्रहण केलेल्या जमिनीवरून हलवू नये. ग्रामसभा ही निर्णय घेणारी संस्था आहे व सर्व प्रक्रियांमध्ये समुदायांचा सहभाग सुनिश्चित करणे गरजेचे आहे.

## योग्य मोबदला आणि पारदर्शक जमीन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनःस्थापना कायदा, २०१३

या कायद्यामुळे जमीन अधिग्रहणासाठी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्राम सभा, यांच्याशी सल्लामसलत करून मानवी, सहभागास प्रवृत्त करणारी, माहिती देणारी आणि पारदर्शक व्यवस्था सुनिश्चित केली जाते. त्याचबरोबर सर्व माहिती योग्यपणे दिल्यानंतरच सार्वजनिक सुनावणी केली जाते.

## पर्यावरणविषयक कायदे

पर्यावरणविषयक कायदे उद्योगांच्या स्थानावर प्रतिबंध घालून त्यावर मर्यादा आणतात. वेगवेगळया भागातून विविध प्रक्रिया करून व पर्यावरण प्रभाव परीक्षणाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करून देतात, जनतेचा सहभाग व न्याय मिळवून देतात. एखाद्या प्रकल्पामुळे किंवा उपक्रमामुळे पर्यावरणावर झालेल्या परिणामांनी प्रभावित झालेल्या लोकांसाठी सार्वजनिक सुनावणीची प्रक्रिया सुनिश्चित केली जाते.

## जैव विविधता अधिनियम, २००२

या कायद्याद्वारे, जैविक विविधतेचे संवर्धन, जैविक विविधतेचा संयत वापर आणि नैसर्गिक संपत्तीच्या वापरातून होणाऱ्या फायद्यांचे समान वाटप अशा बाबी सुनिश्चित केल्या जातात. त्याचबरोबर, योग्य सल्लामसलत करून व समुदायांकडून पूर्वसूचित संमती घेऊन ज्ञान मिळविण्याबाबत देखील सुनिश्चितता आणली जाते.

### एफपीआयसीची अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी लागणारी साधने

संस्थेमध्ये एफपीआयसी सुरळीतपणे राबविण्यासाठी मनुष्यबळ, क्षमता विकास आणि पूर्णपणे कार्यरत असलेल्या तक्रार निवारण केंद्राची गरज असते.


- मनुष्यबळाची क्षमता स्थापित करणे
- तक्रार निवारणाची यंत्रणा
- क्षमता विकास व मार्गदर्शन


स्वतंत्र, पूर्वसूचित आणि माहितीच्या आधारे दिली जाणारी समंती(एफपीआयसी)-अंमलबजावणी करताना

| | |
|---|---|
| **ओळख करून घेतानाच्या टप्प्यामध्ये** | • स्थानिक लोकांच्या समस्या व त्यांचे प्रतिनिधी ओळखणे<br>• स्थानिक लोकांच्या सहभागातून भौगोलिक व लोकसंख्येविषयी माहिती गोळा करणे |
| **सूत्र तयार करण्याच्या टप्प्यामध्ये** | • उपाय शोधणे तंटा सोडवणे व बाहेर पडण्यासाठीचे धोरण ठरविणे<br>• प्राथमिक आर्थिक व मनुष्यबळ ठरविणे एफपीआयसीची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारा वेळ ठरविणे<br>• लोक सहभागी होतील अशा दृष्टिकोनातून संवादाचे नियोजन करून वारंवार सल्लामसलत करणे आणि त्यातून पारदर्शक पद्धतीने प्रकल्पाची माहिती उघड करणे |
| **अंमलबजावणीच्या टप्प्यामध्ये** | • कराराची तपासणी आणि मूल्यमापन करणे अभिप्रायाचे एकत्रीकरण<br>• कळून आलेल्या दाखवून दिलेल्या चुकांची नोंद ठेवणे |
| **शेवटच्या टप्प्यामध्ये** | • कराराची तपासणी आणि मूल्यमापन करणे अभिप्रायाचे एकत्रीकरण<br>• कळून आलेल्या दाखवून दिलेल्या चुकांची नोंद ठेवणे |

# एफपीआयसीतून एका समृद्ध समुदायाकडे वाटचाल

## संस्था, समर्थक, प्रशासन व व्यवसाय अशा सर्वांच्या सुविधेसाठी...





आदिवासी जनजाती अधिकार मंच

आ ज म

actionaid